**ठळक बातम्या**

- देशाच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग परिसंस्था मजबूत असणं आवश्यक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- भारत आणि चीनमधले मतभेद कमी करून सीमावाद सोडवण्यासाठी उपाय शोधण्यावर भारताचा भर असल्याचं संरक्षणमंत्र्यांचं प्रतिपादन

- ओडिशामध्ये जगप्रसिद्ध भगवान जगन्नाथ रथयात्रेला आज पुरी इथं सुरुवात

**आणि**

- हॉकी इंडिया मास्टर्स कप स्पर्धेत महिला आणि पुरुष गटाचे अंतिम सामने आज चेन्नईत होणार

**<><><><>**

देशाच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी मजबूत MSME अर्थात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग परिसंस्था आवश्यक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं आंतरराष्ट्रीय MSME दिनाच्या कार्यक्रमाला त्या संबोधित करत होत्या. MSME क्षेत्र देशाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्या म्हणाल्या.

- **होल्ड बाईट - राष्ट्रपती -**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग हे भारतीय आणि जागतिक अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. जगभरात MSME क्षेत्राची महत्त्वाची भूमिका ओळखून संयुक्त राष्ट्रांनी २०१७ मध्ये २७ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय MSME दिन म्हणून घोषित केला. यंदाचा MSME दिवसाचा विषय, शाश्वत विकास आणि नवोन्मेषाचे चालक म्हणून MSME ची भूमिका वाढवणं हा आहे.

**<><><><>**

सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या विविध कामगिरींचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक झाली. या बैठकीला अर्थ

राज्यमंत्री पंकज चौधरी, वित्तीय सेवा विभागाचे सचिव एम. नागराजू आणि सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

<><><><>

ऑपरेशन सिंधू अंतर्गत, इराणमधून १७३ भारतीय नागरिकांना घेऊन एक विशेष विमान रात्री उशिरा नवी दिल्लीत पोहोचलं. आतापर्यंत १९ विशेष उड्डाणांद्वारे एकूण ४ हजार ४१५ भारतीय नागरिकांना मायदेशी आणण्यात आलं आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी एका सामाजिक माध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली. इराणमधून मायदेशी परतलेल्या ३ हजार ५९७ आणि इस्रायलमधून आलेल्या ८१८ व्यक्तींचा यात समावेश असल्याचं जयस्वाल यांनी सांगितलं. भारतीय नागरिकांव्यतिरिक्त ९ नेपाळी, ४ श्रीलंकेचे आणि एका भारतीय नागरिकाच्या इराणी पत्नीचा समावेश आहे.

<><><><>

भारत आणि चीन दरम्यान २०२०मध्ये झालेल्या सीमावादानंतर दोन्ही देशांत पुन्हा एकदा विश्वास निर्माण करण्यासाठी कायमस्वरूपी तोडगा काढण्यावर भारतानं कायमच भर दिल्याचं राजनाथ सिंह यांनी चीनचे संरक्षणमंत्री ॲडमिरल डोंग जुन यांच्याशी झालेल्या द्विपक्षीय बैठकीत सांगितलं. चीनमध्ये सुरू असलेल्या संरक्षणमंत्र्यांच्या SCO च्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर या दोन्ही देशांच्या संरक्षणमंत्र्यांची स्वतंत्र बैठक झाली.

दोन्ही देशांमधील संबंध सर्वसामान्य व्हावे, यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांबद्दल राजनाथ सिंह यांनी समाधान व्यक्त केलं. परस्पर विश्वास, शांततेचे वातावरण आणि शेजारधर्म जोपासला जावा, आशिया आणि जगात स्थैर्य टिकवण्यासाठी सहकार्याची गरज असल्याचा मुद्दा सिंह यांनी उपस्थित केला. सीमावाद, तणाव निवळवणं, सीमा व्यवस्थापन आणि सीमारेषांची निश्चितीच्या मुद्द्यांवर विविध पातळ्यांवर सल्लामसलत सुरू ठेवण्याचं दोन्ही नेत्यांनी मान्य केलं. या बैठकीत राजनाथ सिंह यांनी पहलगामचा हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरची माहिती चीनच्या संरक्षणमंत्र्यांना दिली.

रशियाचे संरक्षण मंत्री आंद्रे बेलोउसॉव यांच्याशीही संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी द्विपक्षीय बैठक घेतली. या बैठकीत एस-४०० संरक्षण प्रणाली, एसयू-३० एमकेआय लढाऊ विमानांचे आधुनिकीकरण आणि अत्यावश्यक लष्करी उपकरणांचा वेगवान पुरवठा यासंबंधी सखोल चर्चा झाली. आंतरराष्ट्रीय घडामोडी, सीमा पार दहशतवाद आणि भारत-रशिया

संरक्षण सहकार्याच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. रशियाचे संरक्षण मंत्री बेलोउसॉव यांनी भारत-रशिया मैत्रीचा पुनरुच्चार केला.

बेलारूस, ताजिकिस्तान आणि कजाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांबरोबरही संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी बैठका घेतल्या. या बैठकांत देशांसोबत संरक्षण सहकार्यात सातत्य ठेवण्याचं महत्त्व अधोरेखित केलं. भारतानं संरक्षण उत्पादनाच्या क्षेत्रात आत्मनिर्भर होत केलेल्या प्रगतीची माहिती या देशांना संरक्षणमंत्र्यांनी दिली. पहलागमचा दहशतवादी हल्ला आणि त्याला ऑपरेशन सिंदूर राबवत भारतानं दिलेलं चोख प्रत्युत्तराची माहिती देखील सिंह यांनी दिली.

**<><><><>**

युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयानं व्हाट्सॲपद्वारे माय भारत पोर्टल सुरू केलं आहे. डिजिटल सहभाग वाढवणं आणि तरुणांसाठी सेवा सुलभ करण्यासाठी हा या मागचा उद्देश आहे. ७-२-८-९-०-०-१-५-१-५ या व्हाट्सएप क्रमांकाद्वारे माय भारत पोर्टलवर व्हाट्सॲप चॅटबॉटने संवाद साधता येणार आहे. व्हॉट्सॲपद्वारे माय भारत सेवांमध्ये सोयीस्कर प्रवेश, जलद ऑनबोर्डिंग, कार्यक्रमांमध्ये सहभाग आणि अर्जांची पाठपुरवठा, रिअल-टाइम अपडेट्स आणि सुलभ समस्या अहवाल आणि निराकरण हे चॅटबॉटचे काही प्रमुख फायदे आहेत.

**<><><><>**

ओडिशामध्ये जगप्रसिद्ध भगवान जगन्नाथ आणि त्यांची भावंडं बलभद्र आणि सुभद्रा या देवतांच्या रथयात्रेला आज सकाळी पुरी शहरात मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. त्यासाठी जगभरातील हजारो भक्त पुरीमध्ये जमले आहेत. ही रथयात्रा तिन्ही देवतांना श्री गुंदीचा मंदिराकडे नऊ दिवसांसाठी घेऊन जाते. यात्रेच्या वेळापत्रकानुसार, श्री जगन्नाथ मंदिरापासून त्यांच्या संबंधित रथांपर्यंत देवतांच्या भव्य मिरवणुकीचा पहाडी बिजे विधी आज सकाळी साडेनऊ वाजता झाला. गजपती राजा दिव्यसिंहदेव या तीन रथांवर आज दुपारी अडीच ते साडेतीनदरम्यान चेहरा पहानरा विधी आणि शासकीय स्वच्छता विधी पार पडतील. त्यानंतर आज संध्याकाळी चार वाजता सध्याच्या अनंत रोडवर रथ ओढण्यास सुरूवात होणार आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ओडिशात पुरी इथल्या पवित्र रथयात्रेच्या शुभ प्रसंगी सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><>**

पुढच्या वर्षीच्या साखर हंगामात भारतातलं साखर उत्पादन १५ टक्क्यांनी वाढून साडेतीन कोटी टनांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. क्रेडिट रेटिंग या संस्थेनं प्रकाशित केलेल्या अहवालात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडल्यामुळे ही वाढ होण्याची शक्यता वर्तवली आहे. जास्त पाऊस पडल्यामुळे ऊस उत्पादक राज्यांमध्ये विशेषतः महाराष्ट्र आणि कर्नाटकात, उसाचं उत्पादन आणि लागवडीखालचं क्षेत्र वाढणार आहे. पुरवठा वाढल्यामुळे देशांतर्गत पुरवठ्याची चिंता कमी होईल. धोरणात्मक परिस्थिती अनुकूल असल्यास इथेनॉल उत्पादनही मोठ्या प्रमाणात होईल, असं या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><>**

कर्नाटकमधे चामराजनगर जिल्ह्यातल्या मलय महादेश्वर अभयारण्यात एक वाघीण आणि तिचे चार बछडे मृतावस्थेत आढळले आहेत. वाघांना मारण्यासाठी आमिष म्हणून गायीच्या मृतदेहात विष मिसळण्यात आलं असावं, असा अंदाज वन अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. राज्याच्या वनमंत्र्यांनी या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले आहेत. कर्नाटक ५६० हून अधिक वाघांसह देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे .

**<><><><>**

हॉकी इंडिया मास्टर्स कप स्पर्धेत महिला आणि पुरुष गटातील अंतिम सामने आज दुपारी चेन्नईत होणार आहे. पुरुष गटात तमिळनाडू आणि महाराष्ट्राच्या संघाची लढत आज दुपारी चार वाजता होणार आहे, तर महिलांच्या गटात ओडिशा आणि पंजाब यांच्यातली अंतिम लढत दुपारी २ वाजता सुरू होईल.

आज महिलांच्या गटातील तिसऱ्या आणि चौथ्या स्थानासाठी झालेल्या सामन्यात हरयाणानं यजमान तमिळनाडूचा ४-३ असा पराभव केला. तर पुरुषांच्या गटात चंदीगढनं ओदिशावर २-१ अशी मात करत तिसरा क्रमांक मिळवला.

**<><><><>**

दुसऱ्या आशियायी स्क्वॉश दुहेरी अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं काल तिन्ही गटातलं विजेतेपद पटकावलं. पुरुष दुहेरीच्या अंतिम सामन्यात अग्रमानांकित अभय सिंग आणि वेल्वन लेंतिलकुमार यांनी पाकिस्तानच्या नूर जमान आणि नसीर इक्बाल यांच्यावर २- १ अशी मात केली. महिला दुहेरीचं अजिंक्यपद द्वितीय मानांकित जोशना चिनप्पा आणि अनाहत सिंग या भारतीय जोडीनं पटकावलं.  तर अव्वल मानांकित अभय आणि अनाहत या जोडीनं मिश्र दुहेरीत २-० नं विजय मिळवला.

//<><><><>//